॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## परिपत्रक क्रमांक :१७७/२०२०

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक,
तसेच सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,

**विषय :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत बांबूची राखी तयार करण्यासाठी प्रोत्साहन देणेबाबत.

**संदर्भः-** (1) व्यवस्थापक, विवेक रूरल डेव्हलपमेंट सेंटर संचलित राष्ट्र सेवा समिती यांचे कडील दि.६.०७.२०२० रोजीचे पत्र.

(2) Deputy Secretary to the Governor of Mahaharashtra, Raj Bhavan, Mumbai letter No.CS/Gen/2018/CR-123/697 dated 9th July,2020

उपरोक्त संदर्भांकित पत्रांची प्रत ह्या परिपत्रकासोबत जोडली आहे कृपया, त्याचे अवलोकन करावे.

मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते राजभवानात आदिवासी भगिनींनी बनविलेल्या बांबू राखींचे विमोचन करण्यात आले. आदिवासी महिलांनी बनविलेल्या राख्या मोठ्या प्रमाणात विक्री होऊन त्यांना समन्मान जनक रोजगार प्राप्त व्हावा ह्या करीता महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत प्रोत्साहन देण्यात यावे, या बाबत कार्यवाही करण्यासाठी संदर्भ क्र.(०२) अनुसार कळविण्यात आले आहे.

आदिवासी महिला भगिनींना बांबूपासून पर्यावरण पूरक आकर्षक वस्तू, **राख्या** विक्रीतून रोजगार प्राप्त व्हावा व त्यांचा कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या हातभार लागावा आणि त्यांना सन्मान जनक आयुष्य जगाता यावे, यासाठी प्रोत्साहन म्हणून विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविलय / परिसंस्था ह्या मधील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विवेक रूरल डेव्हलपमेंट सेंटर संचलित **राष्ट्रीय सेवा समितीचे व्यवस्थापक** यांच्याशी संपर्क साधावा, असे मा.कुलगुरू महोदय यांच्या आदेशान्वये कळविण्यात येत आहे.

तेव्हा, मा. राज्यपाल महोदय ह्यांच्या कार्यालयाकडील पत्रातील सूचना विचारात घेऊन, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था ह्यांचे सर्व मा. प्राचार्य / मा. संचालक तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा. संचालक / विभागप्रमुख व संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी वरील प्रमाणे अंमलबजावणी आपल्या स्तरावरून करावी.

**सोबत :- वरील प्रमाणे**

आदेशान्वये,

जा.क्र.कबचौउमवि/२/ २३७ /२०२०
दि. ११.०७.२०२०

(प्रा. भा. व्यं. पवार)
**प्र. कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य व अधिष्ठाता, कबचौउमवि-जळगाव. २. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव. ३. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव. ४. मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१. ५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव. ६. मा. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि-जळगाव, ७. मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि-जळगाव. ८. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कबचौउमवि -जळगाव.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

CS/Gen/2018/CR-123/657

DEPUTY SECRETARY TO THE
GOVERNOR OF MAHARASHTRA

RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

09 July 2020.

**Respected Sir/Madam**

Shri Lukesh Band, Manager, Vivek Rural Development Centre, Bhalivali, Tal. Vasai, Dist, Palghar, met Hon"ble Chancellor on 06.07.2020 and informed about the potential of Bamboo Rakhi to supplement the livelihood of tribal women.

In this regard, the Hon'ble Chancellor is of the view that the State Universities may extend necessary support to the Vivek Rural Development Centre, which is engaged in training of tribal women in making of Bamboo Rakhi. A copy of the email dated 06.07.2020 received from Shri Shri Lukesh Band, Manager, Vivek Rural Development Centre, is enclosed herewith.

I am, therefore, desired to request you to kindly take appropriate steps in order to promote the Bamboo- Rakhis made by tribal women and to get in touch with the Manager, Vivek Rural Development Centre for the same.

**With regards,**

Yours sincerely,

..9.7

**(Prachi Jambhekar)**

**All the VCs of the Universities.**

नोंदणी क्रमांक : यु ९३०० एम एच २०१४ एन पी एल २५१७४१ दिनांक : ०६/०१/२०१४

PAN NO.: AAECV6905E

विवेक रुरल डेव्हलपमेंट सेंटर संचालित

राष्ट्र सेवा समिती

दिनांक:-०६.०७.२०२०

प्रती,
श्री.प्रताप लुबाळ.
अवर सचिव (शिक्षण)

विषय:- महाराष्ट्रातील विद्यापीठे व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) बांबूराखी करिता मा.राज्यपालजी ह्यांचे पत्र

महोदय,

आज दिनांक ०६.०७.२०२० रोजी मा.राज्यपालजी ह्यांचा हस्ते राजभवनात संस्थेतील आदिवासी भगिनींनी बनविलेल्या बांबू राखींचे विमोचन झाले. मा.राज्यपालजी सोबत झालेल्या चर्चेनुसार आदिवासी भगिनींनी बनविलेल्या बांबू राख्या मोठ्या प्रमाणात विक्री व्हावी व त्यातून आदिवासी महिलांना सन्मान जनक रोजगार प्राप्त व्हावा ह्या करिता महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांचामार्फत ते करण्यात यावे असे त्यांनी सुचवले व तसे पत्र हि महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) ह्यांचा प्रमुखांचा नावे देतो असेही मा.राज्यपालजी ह्यांनी सांगितले. आपणास नम्र विंनती आहे की लवकरात लवकर जर पत्र मिळाले तर जास्तीत जास्त विद्यार्थी ,विद्यापीठे आदी पर्यंत पोहचता येयील.

विवेक रूरल डेव्हलपमेंट सेंटर संचलित राष्ट्र सेवा समिती मागील १० वर्षापासून पालघर जिल्हात आदिवासी समाजाचा प्रगती व स्वावलंबनासाठी कार्यरत आहे.संस्था मुख्यत :शिक्षण ,रोजगार व पर्यावरण ह्या क्षेत्रात कार्य करीत आहे प्रशिक्षण व रोजगार ह्या क्षेत्रात संस्था परिसरातील गरजू आदिवासी महिला वर्गाला बांबू हस्तकलेचे मोफत प्रशिक्षण देते. आतापर्यंत प्रशिक्षणाचा १३ बॅचेस पूर्णकेल्या व त्यातून शेकडो हून अधिक महिलांना प्रशिक्षित केले. ह्या प्रशिक्षित आदिवासी महिला १९ हून अधिक बांबू पासून पर्यावरण पूरक आकर्षक वस्तू बनवितात .ह्या महिला वर्गानी बनविलेल्या वस्तू,राख्या संस्था विविध माध्यमातून विक्री करते व विक्री झालेल्या वस्तू मधून जे उत्पन्न येते ते ह्या महिला वर्गाला दिले जाते.जेणेकरून त्यांना रोजगार प्राप्त होतो .त्यांचा कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या हातभार लागतो व त्यांना सन्मान जनक आयुष्य जगता येते.

आमचा ह्या सामाजिक कार्याची दखल घेयून महाराष्ट्र राज्य शासनाने सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ ह्या करीता **"आदिवासी सेवा संस्था"** ह्या पुरस्काराने संस्थेस सन्मानीत सुद्धा केले आहे.

**बांबू राखी करिता संपर्क:- सौ.प्रगती भोईर-७७९८७११३३३ / ८००७२०४५६७**

आपला हितचिंतक
श्रीलुकेश बंड
(८४११०७८४८४-व्यवस्थापक)